# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक :- 03/03/2020 (बजेट सभा)**

**सभा सुचना क्र. 28 सकाळी 11.30 वा.**

| क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 97 अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन 2019-20 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2020-21 चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज "ब" मा. स्थायी समितीपुढे सादर करणे. | **ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 97 नुसार परिवहन व्यवस्थापक यांनी सादर केलेल्या माहिती, प्रस्ताव उव अंदाजाबाबत विचार विमर्ष व आवश्यक ते खालील फेरबदल करुन याच अधिनियमाचे कलम 98 (3) नुसार 2019-20 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2020-21 चे अंदाजपत्रक "ब" तयार करुन मा. स्थायी समितीपुढे सादर केलेल्या कार्यवाहीस हि सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. उमेश नाईक सूचक :- मा. श्री. हार्दीक राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह "अ" व "क" अंदाजपत्रकाचे सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज मा. स्थायी समितीने तयार करणेसाठी मा. आयुक्तांनी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज सादर करणे. | **ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह "अ" व "क" अंदाजपत्रकाचे सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मुळ अर्थ संकल्पिय अंदाज मा. स्थायी समितीने तयार करणेसाठी मा. आयुक्तांनी उत्पन्न व खर्च यांचे सादर करणेबाबत केलेल्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत सूचक :- मा. श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 98 अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन 2019-20 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2020-21 चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज "ब" मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 98 नुसार वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन 2019-20 च्या सुधारित व सन 2020-21 चे मुळ अंदाज पत्रक मा. स्थायी समितीने सादर केलेला आहे. प्रस्ताव व अंदाजाबाबत विचार विमर्ष करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 98 (3) नुसार 2019-20 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रक "ब" प्रस्तावाचे वाचन करताना अर्थसंकल्पातील मुद्रण दोष दुरुस्त करण्यात येऊन मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस हि सभा मंजूरी देत आहे. |

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. स्थायी समितीने मा. सर्वसाधारण सभेस सुधारीत अर्थसंकल्प सन 19-20 सह मुळ सन 2020-21 साठी शिफारस केलेले अंदाजपत्रक | |
|---|---|---|---|
| | | सुधारीत अर्थसंकल्प सन 2019-20 | मुळ अंदाज सन 2020-21 |
| 1 | प्रारंभिक शिलकेसह जमा रकमा | 2638.36 | 7315.03 |
| 2 | खर्च रकमा | 2315.13 | 7234.72 |
| 3 | अखेर शिल्लक | 323.23 | 80.31 |

**अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत सूचक :- मा. श्री. हार्दीक राऊत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेंसह "अ" व "क" अंदाजपत्रकाचे सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

**ठराव :-** पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन 2019-20 चे सुधारीत अंदाज व सन 2020-21 चा मुळ अंदाज तयार करताना मा. स्थायी समितीने दि. 3/03/2020 ते दि. 11/03/2020 या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

1 प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले.

2 कत्तल खान्याचे उत्पन्न सन 2020-21 मध्ये रु. 25 लक्ष तरतुद ऐवजी 2.50 लक्ष करण्यांत आली आहे.

3 पे ॲन्ड पार्क वाहनतळ व्यवस्था व नोपार्किंग मधील वाहने उचलणे प्रशासकिय शुल्क सन 2020-21 मध्ये रु. 7 लक्ष तरतुद ऐवजी 15 लक्ष करण्यांत आली आहे.

4 अतिक्रमण हटविणे, अनधिक्रत बांधकाम तोडणे प्रशासकिय शुल्क सन 2019-20 मध्ये रु. 15 लक्ष तरतुद ऐवजी रु. 9 कोटी 49 लक्ष 60 हजार करण्यांत आली आहे.

5 अतिक्रमण हटविणे, अनधिक्रत बांधकाम तोडणे प्रशासकिय शुल्क सन 2020-21 मध्ये रु. 15 लक्ष तरतुद ऐवजी रु. 7 कोटी 50 लक्ष करण्यांत आली आहे.

6 बाजार फी/हातगाडी फेरीवाले व इतर सन 2020-21 मध्ये रु. 4 कोटी 60 लक्ष तरतुद ऐवजी रु. 6 कोटी 20 लक्ष करण्यांत आली आहे.

7 प्रायोगिक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवेसह इतर परिवहन सेवा अंशदान सन 2019-20 मध्ये रु .22

कोटी 68 लक्ष तरतुद ऐवजी रु. 23 कोटी 28 लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

8 प्रायोगिक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवेसह इतर परिवहन सेवा अंशदान सन 2020-21 मध्ये रु .62 कोटी 68 लक्ष तरतुद ऐवजी रु. 66 कोटी 58 लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

9 विकास विषयक कामांसाठी राखीव निधी या लेखाशिर्षात बदल करण्यांत आला व त्यामध्ये निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे असे समाविष्ट करण्यांत आले.

10 शहीद जवान निधी सन 2019-20 मध्ये रु. 1 लक्ष तरतुद ऐवजी रु. 5 लक्ष करण्यांत आली आहे.

11 मध्यवर्ती वाचनालय (इमारत बांधकामासह) व्यवस्था सन 2020-21 मध्ये रु. 01 हजार तरतुद ऐवजी रु. 5 कोटी इतकी करण्यांत आली आहे.

12 मत्सालय निर्मिती सन 2020-21 मध्ये रु. 01 हजार तरतुद ऐवजी रु. 1 कोटी 50 लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

13 सुर्या योजना विद्युत खर्च सन 2019-20 मध्ये रु. 24 कोटी तरतुद ऐवजी रु. 26 कोटी 10 लक्ष इतकी करण्यांत आली आहे.

14 नाले सफाई/ खोदाई सन 2019-20 मध्ये रु. 25 कोटी तरतुद ऐवजी रु. 20 कोटी इतकी करण्यांत आली आहे.

15 नाले सफाई/ खोदाई सन 2020-21 मध्ये रु. 10 कोटी 25 लक्ष तरतुद ऐवजी रु. 20 कोटी इतकी करण्यांत आली आहे.

16 अमृत भुयारी गटार योजना सन 2019-20 मध्ये रु 0 तरतुद ऐवजी रु. 2 कोटी इतकी करण्यांत आली आहे.

17 अमृत भुयारी गटार योजना सन 2020-21 मध्ये रु 0 तरतुद ऐवजी रु. 4 कोटी इतकी करण्यांत आली आहे.

18 विकास कामांव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असणाऱ्या तरतुदी सद्यस्थितीत समप्रमाणात विभागणी करुन नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतेनुसार मा. आयुक्त सा. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखा शिर्षातर्गत एकूण उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील.

19 विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्ठीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली.

20 अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत: मान्य

करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोक्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन 2019-20 चे सुधारीत अर्थसंकल्प व सन 2020-21 चे मुळ पी बजेट, जेण्डर बजेट, दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना / अमृत योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रु. कोटीत)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन 2019-20 | मुळ अर्थसंकल्प सन 2020-21 |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 599.10 | 566.94 |
| जमा रकमा | 1319.17 | 1475.43 |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | 1918.27 | 2042.37 |
| **खर्च रकमा** | 1351.32 | 1961.63 |
| अखेर शिल्लक | 566.94 | 80.74 |

**अनुमोदक :- मा.श्री. उमेश नाईक सूचक :- मा. श्री. नितीन राऊत**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगरसचिव
वसई विरार शहर महानगरपालिका